सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

अमळनेर | वर्ष १ ले | अंक : १३ | रविवार, दि. ५ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | किंमत : १ रु.

https://epaper.globalmahatej.com/ | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

०५ ऑक्टोबर

- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार जाहीर.
- कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा जनस्थान पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत यांना जाहीर
- पंडित नेहरूंच्या हस्ते हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्याचे उद्घाटन झाले. भारताच्या औद्योगिक विकासात या कारखान्याचे स्थान महत्त्वाचे मानले जाते.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**
**जय भारत...!**
**जय स्वदेशी...!!**

# एस.टी. स्टॅण्डच्या हिरकणी कक्षाला टवाळखोरांच्या भीतीने कुलूप



## गुटखा खाऊन पिचकारी मारणाऱ्या तरुणांकडूनच करण्यात आली सफाई

ग्लोबल महातेज वृत्तसेवा
**रजनीकांत पाटील**

अमळनेर : येथील बसस्थानकात बालकांना स्तनपानासाठी हिरकणी कक्ष उभारण्यात आला आहे. हा कक्ष प्रत्यक्षात नेहमीच कुलूपबंद ठेवावा लागतो. त्याचे कारण म्हणजे या परिसरात टवाळखोर अल्पवयीन तरुणांचा नेहमीच वावर असतो. त्यामुळे महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.






इतकेच नव्हे तर काही युवक व युवती हिरकणी कक्षात शिरुन नको ते प्रकार करीत असल्याच्याही घटना घडल्या आहेत. इतकेच नव्हे तर काहींनी तेथे छान पैकी बैठक मारून दारू आणि चखण्याचाही आनंद घेतला आहे. शुक्रवारी पुन्हा एक धक्कादायक प्रकार समोर आला. या कक्षाजवळ काही तरुण गुटखा खाऊन थुंकताना आढळले. सफाई कर्मचारी परिसर स्वच्छ करताना हे त्यांच्या निदर्शनास आले. ही बाब त्यांनी बसस्थानकातील कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिली. त्या तरुणांना बस स्थानकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेऊन त्यांना जाब विचारून चांगलेच धारेवर धरण्यात आले. या तरुणांनीच मारलेल्या गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी माखलेल्या फरशीची स्वच्छता करण्यात आली. पुन्हा असे कृत्य करताना आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, अशी सक्त ताकीदही त्यांना देण्यात आली.

बसस्थानकात पोलिस चौकी असूनही टवळखोरांच्या वाढत्या धाडसामुळे प्रवासी महिला व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. महिलांसाठी असलेला हिरकणी कक्ष नेहमी बंद असतो. याबाबत प्रवाशांनी विशेषतः ज्या मातांजवळ लहान बाळ असतात त्यांनी तर खूपच नाराजी व्यक्त केली आहे. प्रवाशांचे म्हणणे आहे की, हिरकणी कक्ष असूनही नसल्यासारखा आहे. मातांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. बस स्थानक प्रशासनाने या कक्षाला नेहमी खुला ठेवावा. हिरकणी कक्षाच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करावी.

दरम्यान, बसस्थानकातील कर्मचाऱ्यांनी सांगितले, की बाजूलाच आमचे चौकशी ऑफिस आहे. हिरकणी कक्षाची किल्ली आमच्याकडेच असते. जेव्हा गरज भासते, तेव्हा महिलांना आम्ही त्वरित सुविधा उपलब्ध करून देतो. मात्र, जर कक्ष नेहमी उघडा ठेवला तर टवळखोर तरुण त्या ठिकाणी जमा होतात. त्यामुळेच कक्ष कायम उघडा ठेवणे धोक्याचे ठरते. मात्र, अनेक मातांना हिरकणी कक्षाची किल्ली चौकशी ऑफिसमध्ये असते ही बाब माहित नाही. त्यामुळे हिरकणी कक्षावर तसा फलक लावल्यास मातांची सोय होईल, असे महिला प्रवाशांनी सुचविले.

### ' ते ' डुकरीणचे किंवा कुत्रीणीचे दूध पिऊन मोठे झाले असतील

हिरकणी कक्षाची सोय नसल्याने खुलेआम बालकांना अंगावरचे दूध पाजताना अनेक माता लज्जीत होतात. काही विकृत नजरा त्यांच्या लक्षात येतात. मात्र, बाळाच्या भुकेपुढे माता सारे काही सहन करतात. दुध पाजणाऱ्या माता आणि काही विकृतांमध्ये वादही झाले आहेत. त्याबाबतची माहिती एका संतप्त महिला प्रवाशाने दिली. त्या महिलेने सांगितले, की मला असे वाटते, की अंगावरचे दूध पाजणाऱ्या मातेकडे विकृत नजरेने एक टक पाहणारे त्यांच्या आईचे दूध पिऊन मोठे झाले नसतील. ते डुकरीणीचे किंवा कुत्रीणीचे दूध पिऊन मोठे झाले असतील. त्यांना कदाचित आई- बहीण व मुलगी नसेल. असल्यास त्यांनी त्यांच्याकडेही तसेच पहावे.

# ' हागणदारी मुक्त गाव 'चा उडतोय फज्जा; ग्रामीण भागात अजूनही उघड्यावरच चालतो ' कार्यक्रम '...!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : राज्य शासनाने महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर २०१४ मध्ये सुरू केलल्या ' हागणदारी मुक्त गाव' अर्थात ' शौचालय मुक्त गाव' या अभियानाचा ग्रामीण भागात प्रत्यक्षात सपशेल फज्जा उडाल्याचे चित्र दिसत आहे. गावोगावी शौचालयांची उभारणी करणे, जनजागृती व स्वच्छतेबाबत शिक्षण देणे, समुदायाचा सहभाग घेणे, ग्रामीण व शहरी भागातील स्वच्छतेत सुधारणा करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता.

या अभियानांतर्गत शौचालय बांधण्यासाठी शासनाने अनुदान दिले असतानाही अनेक कुटुंबे अजूनही उघड्यावर शौचास जात आहेत. त्यामुळे स्वच्छ भारत अभियान आणि निर्मलग्राम योजनांची प्रभावी अंमलबजावणी पाहिजे तशी झालेलीच नाही, असे स्पष्टपणे जाणवते. अनेक मोठ्या खेड्यांमध्येही रस्त्याच्या कडेला शौचास बसण्याची प्रथा कायम आहे. उघड्यावर शौचास जाऊन अनेक आजारांना आमंत्रण देण्याऐवजी शौचालये बांधण्याची संकल्पना सरकारने राबविली होती. यामध्ये नागरिकांना लाभाच्या योजना देताना शौचालय बांधणे सक्तीचे करण्यात आले. मात्र, नागरिकांनी यातून सोयीस्कर पळवाट शोधली. अनेकांनी लाभाच्या योजनांचा फायदा घेण्यासाठी तात्पुरती शौचालये रातोरात उभी केली. परंतु अशी शौचालये केवळ ' शो पीस ' ठरल्याचे दिसत आहे.



वापरण्याजोगी, चांगल्या दर्जाची शौचालये बांधून त्यांचा योग्य वापर केला जात नाही. ग्रामीण भागात उघड्यावर शौचास बसणाऱ्यांना काहीही वावगे वाटत नाही आणि बघणाऱ्यांनाही वावगे वाटत नाही. ' हागणदारी मुक्त गाव' अभियानासाठी शासन स्तरावर जनजागृतीसह विविध प्रयत्न जिल्हा परिषदेमार्फत आजवर करण्यात आले. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ' गुड मॉर्निंग पथके 'ही तयार केली गेली. त्यानंतर गावोगावी ' हागणदारी गाव मुक्त'चे फलकही लावले गेले. मात्र प्रत्यक्षात अभियान यशस्वी झाल्याचे चित्र कुठेही दिसत नाही. प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे आणि लोकसहभागाच्या अभावामुळे ' गुड मॉर्निंग पथके ' केवळ कागदावरच राहिली आहेत.

सुरूवातीला ज्या स्वच्छता अभियानाचा एक भाग म्हणून सकाळी उघड्यावर शौचास जाणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण होते ती भीती आता पूर्णपणे नाहीशी झाली आहे. ग्रामस्थ बिनधास्तपणे उघड्यावर शौचास बसताना दिसतात. अनेक गावांमध्ये प्रवेश करताना अथवा बाहेर पडताना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. इतकी परिस्थिती बिकट झाली आहे.

### जे ऑब्जेक्शन पदर बाबत आहे ते उघड्यावर का नाही?

ग्रामीण भागात विवाहीत महिलेचा पदर डोक्यावर नसला तरी ते गैर मानले जाते. केवळ डोक्यावर पदर दिसला नाही म्हणून विवाहीतेला मारहाण झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. मात्र हिच माता भगीनी उघड्यावर शौच करते, याबाबत मात्र कुणालाही वावगे कसे वाटत नाही? असा प्रश्न अनेक संवेदनशील लोकांना पडतो. स्वतःला रूढी व परंपराप्रिय समजणाऱ्या कर्मठ लोकांनी तरी घरातील मुली, सूना आदींना उघड्यावर जाऊ देऊ नये.

### वक्त वक्त की बात होती है...!

अमळनेर : शायरांनी ' वक्त वक्त की बात होती है,' सबसे बडा शहेंशा वक्त होता है ' असे जे म्हटले आहे ते काही खोटे नाही. गणेशोत्सव आणि त्यापाठोपाठ आलेले नवरात्र व दसरा याकाळात फुलांना सर्वार्थाने खूप भाव आला होता. आता मात्र सण, उत्सव, व्रत-



वैकल्ये आदी जवळपास संपले आहे. त्यामुळे फुलांचा त्यातही झेंडूच्या फुलांचा भावही संपला आहे. परिणामी फुले विक्रेत्यांनी विक्री न झालेली फुले थेट रस्त्यावर फेकून दिली. या प्रकाराला ' गरज सरो, वैद्य मरो ' असे म्हटले तरी चालेल. खरे तर या प्रकारातून माणसांनीही बोध घेण्यास हरकत नाही.

# सारबेटे बुद्रुकच्या सरपंचांसह तिघांना मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील सारबेटे बुद्रुक येथील सरपंचांसह तिघांना घरकुलाच्या पैशावरून मारहाण व शिवीगाळ करण्यात आली. ही घटना गुरुवार, ता. २ ऑक्टोबर रोजी घडली. या प्रकरणी चौघांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.



पोलिसांनी सांगितले, की दि. २ रोजी सायंकाळी सारबेटे बुद्रुक येथे महिला सरपंच घरी होत्या. याचवेळी सरफराजखा शफीकखा, मोहसीनखा शफीकखा, फिरोजखा शफीकखा व मोईनखा शफीकखा हे त्यांच्या अंगणात आले. त्यांना शिवीगाळ करू लागले. त्यावेळी सरपंचांनी त्यांना विचारणा केली असता चौघांनी सांगितले, की आमचे घरकुलाचे पैसे तुम्ही का टाकत नाहीत? त्यावर सरपंचांनी उत्तर दिले, की सदर पैसे मी टाकत नसून बीडीओ आणि इंजिनिअर टाकत असतात. मात्र, या सांगण्याचा चौघांना राग आला. त्यांनी सरपंचांना पुन्हा शिवीगाळ करत व चापटा- बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. हा प्रकार पाहून सरपंचांना सोडविण्यासाठी त्यांचे भाऊ व भाचा आले असता त्यांनाही या चौघांनी लोखंडी रॉड, वीट व लाथा- बुक्क्यांनी मारहाण करत जखमी केले. हा प्रकार गावकऱ्यांना कळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत भांडण सोडविले. दरम्यान, सरपंचांचे दोन्ही भाऊ व भाचा गंभीर जखमी झाल्याने त्यांना खसगी रुग्णालयात दाखल केले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. यासंदर्भात सरपंचांनी दिलेल्या तक्रारीवरून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक रामकृष्ण कुमावत तपास करीत आहेत.

# अर्धांगिनी अन् सुकन्येची भूमिका निभावताना... भैरवीताईंनाही करावे लागतात अनेक सीमोल्लंघन !

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सौ. भैरवीताई वाघ - पलांडे हे नाव आता फक्त जळगाव जिल्हाच नव्हे; तर संपूर्ण राज्याला सुपरिचित झाले आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय उदयबापू वाघ आणि खासदार स्मिताताई वाघ यांची ज्येष्ठ सुकन्या इतकीच भैरवीताईंची ओळख आता सीमित राहिलेली नाही. भैरवीताईंनी आई-वडिलांचे नाव, कार्य व इमेजच्या प्लॅटफॉर्मचा आधार जरूर घेतला आहे . मात्र प्लॅटफॉर्मवर उभे राहून स्वतःला सिद्ध करावे लागते. अन्यथा वडिलोपार्जित पुण्यावर मिळालेल्या प्लॅटफॉर्मवर उभे राहण्याची अनेकांना संधी मिळते. परंतु स्वतःला सिद्ध न करता आल्याने ते त्याच प्लॅटफॉर्मवर कोसळतात, प्रसंगी स्वतःचे हसूही करून घेतात. भैरवीताई त्यातल्या निश्चितच नाहीत. भैरवीताईंनी स्वतःला सामाजिक व राजकीय क्षेत्रातील सर्व पातळ्यांवर स्वतःला सिद्ध करून स्वतःची स्वतंत्र इमेज निर्माण केली आहे.

उदयबापू यांचे निधन झाल्यानंतर सर्व शोकाकुल कार्यकर्ते, हितचिंतक व नातेवाईक यांना संबोधताना स्वतःच्या भावना आणि अश्रूंचा बांध फुटू न देता भैरवीताईंनी केलेले कमालीचे भावनिक मनोगत हे चिरस्मरणीय राहील. नव्हे तर त्या मनोगतामुळे भैरवीताईंचा संयम , धीरोदात्तता आणि त्याचबरोबर नेतृत्वगुणांची उंची सिद्ध झाली आहे . भैरवीताई विवाहित आहेत. त्यांच्या सासरी देखील खूप मोठा पसारा आहे. इकडे स्मिताताई एकट्या पडल्या आहेत. वर्षातून सहा महिने स्मितातार्इंना अधिवेशनानिमित्त दिल्लीला राहावे लागते. एकट्या स्मिताताईंना पती आणि मुलगा यांच्या कमतरतेची जाणीव न होऊ देता भक्कम आधार देण्याचे काम भैरवीताई पूर्ण क्षमतेने करीत आहेत. संपूर्ण मतदारसंघात व महाराष्ट्रभरात भारतीय जनता पक्षाचे आणि स्मिताताईंचे प्रतिनिधित्व त्या अत्यंत खंबीरपणे करीत आहेत. कोणत्याही कार्यक्रमात किंवा प्रसंगात स्मिताताई नसल्या तरी त्यांची कमी त्या जाणवू देत नाहीत. मात्र हे करत असताना सासरच्या मंडळींकडून त्यांच्याप्रती सून म्हणून असलेल्या अपेक्षांचीही त्या समर्थपणे पूर्ती करीत आहेत. तर माहेरी वडिलांचे छत्र नसताना कोणत्याही प्रकारच्या भीतीची तमा न बाळगता एखाद्या निडर मुलाप्रमाणे आईला आणि संपूर्ण जळगाव लोकसभा मतदारसंघाला आधार देत आहेत. माहेरकडील राजकीय व सामाजिक जबाबदाऱ्यांचे त्यांच्या कोवळ्या खांद्यावर असलेले अवजड ओझे पेलतांना अनेकदा भैरवीताईंची दमछाक होते. सासर आणि माहेरला वेळ देण्याबाबतचे वेळापत्रक अधुन-मधून गरबडते. परिणामी कधी-कधी पतीच्या व सासरच्या मंडळींच्या व्यक्तिगत अपेक्षा पूर्तीचे सीमोल्लघंन त्यांना करावे लागते. मन आणि भावना काबूत ठेवण्याचेही त्यांना सीमोल्लघंन करावे लागत असेल.

सर्व क्षेत्रातील अनेक मोर्च्यांना सामोरे जात ज्या समर्थपणे भैरवीताई स्वतःला सिद्ध करीत आहेत त्यातून त्यांनी हे निश्चितपणे दाखवून दिले आहे , की त्यांच्या रक्तात वडिलांची अचाट निर्णयक्षमता, निडरता , आईची सोज्वळता याचा सुरेख संगम आहे. भैरवीताईंची चतुरस्त्रता , अष्टपैलूत्व, विनम्रता, अत्यंत मधाळ बोलणे, सर्वांच्या मर्यादा व मान राखणे यातून त्या आगामी काळात आई-वडिलांपेक्षाही त्या अधिक यशवंत, गुणवंत व कीर्तीवंत झाल्यास कोणी आश्चर्य मानू नये.





### माऱ्ही छोरी क्या छोरों से कम है क्या ?

दंगल या गाजलेल्या चित्रपटातील वरील डॉयलॉग तंतोतंत खरा असल्याचे खासदार स्मिताताई वाघ यांचे ठाम मत आहे. याबाबत त्या म्हणतात की, मुलाला नेहमी कुलदीपक व घराण्याचा वारसा चालवणारा म्हटले जाते. काहीअंशी ते खरे ही आहे. मात्र मुली कोणत्याही क्षेत्रात मुलांपेक्षा जराही कमी नसतात. त्यांना जेथे-जेथे आणि जी काही चॅलेंजेबल संधी मिळते त्याचे त्या निश्चितपणे सोने करतात. भैरवीमुळे मला मुलगा नाही अशी भावना माझ्या मनात कधीही एक टक्काही येत नाही. ज्यांना मुलगा नाही अश्यांना माझी कळकळीची विनंती आहे की, कोणीही आपल्याला मुलगा नसून मुलगी आहे, अशी खंत कधीही बाळगू नका. मुलगी केवळ लक्ष्मीच नसते तर ती आदीमाया-आदीशक्तिचे प्रतिरुप असते. तिला गरज असते ती केवळ आई-वडिलांच्या मायेची आणि प्रोत्साहनाची...! बस इतकेच आपण करा मग बघा आपल्या मुली जेव्हा विकासाच्या आणि प्रगतीच्या आकाशात उडतील तेव्हा त्यांना आकाशही अपुरे पडेल.

**श्रीमती स्मिताताई वाघ,** खासदार, जळगाव.



## सेलिब्रेटी ब्रँड व्हॅल्यू म्हणजे काय?

सेलिब्रिटी ब्रँड व्हॅल्यू म्हणजे नक्की काय तर हे एा प्रकारे स्कोअरकार्ड आहे. जेथे वेगवेगळ्या मापदंडांवर या सेलिब्रिटींची रँकिंग केली जाते. यावेळी त्यांच्या कमाईचं मोजमाप करण्यात येतं. हे मुख्यत्वे ब्रँड एंडोर्समेंटमधून ते किती पैसा कमावतात यावर आधारित असते. ब्रँड व्हॅल्यूची तपासणी करण्यासाठी फक्त एकच नाही, तर अनेक मापदंड विचारात घेतले जातात. यामध्ये त्या सेलिब्रिटींची सोशल मीडिया ताकद तपासली जाते. किती लोक त्यांना फॉलो करतात, त्यांच्या पोस्ट्सला किती जण लाईक व शेअर करतात, त्यांच्या एन्डोर्समेंट हिस्ट्रीचीही छाननी केली जाते. जर जुन्या एन्डोर्समेंटमुळे एखाद्या कंपनीच्या सेलमध्ये वाढ झाली असेल, तर त्या सेलिब्रिटीला भविष्यातल्या करारासाठी चांगले मानले जाते. याशिवाय मीडियामधील चांगली प्रतिमा आणि पुरस्कारही यात मोठी भूमिका बजावतात. कोण किती ट्रेंडमध्ये, किती यशस्वी आहे, हेही ब्रँड व्हॅल्यू मोजताना लक्षात घेतले जाते. हे निकष वेगवेगळ्या कंपन्यांप्रमाणे थोडेफार बदलतात.



# ब्रँड व्हॅल्यूत रणवीर बनला सिंह, शाहरुख खानला पछाडले

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : सेलिब्रिटी ब्रँड व्हॅल्युएशन २०२४ च्या रँकिंगमध्ये विराट कोहली अव्वल स्थानावर आहेत. या यादीत रणबीर कपूर बाराव्या, सलमान खान सोळाव्या, तर अल्लू अर्जुन २४व्या स्थानावर आहे. आता क्रोलने प्रसिद्ध केलेल्या यादीत रणवीर सिंगने शाहरुख खानला पुन्हा मागे टाकून दुसरे स्थान पटकावले आहे. सध्याच्या काळात एखाद्या सेलिब्रिटीला मोठा स्टार बनवण्यात त्याच्या ब्रँड व्हॅल्यूचा मोठा वाटा आहे. ही ब्रँड व्हॅल्यू त्यांच्या स्टारडमची कसोटी तर पाहतेच, शिवाय भविष्यातील नवे करार मिळवण्यात देखील त्यांना मोठी मदत होते.

टॉप २५ सेलिब्रिटींच्या यादीत १९ कलाकारांचा समावेश आहे. मात्र, मागील यादीनुसार क्रिकेटपटू विराट कोहली यंदाही पहिल्या क्रमांकावर आहे. त्यांची ब्रँड व्हॅल्यू २३१.१ मिलियन डॉलर्स (१९४२.०४ कोटी रुपये) इतकी आहे. आता दुसऱ्या क्रमांकावर आहे रणवीर सिंग. त्यांची ब्रँड व्हॅल्यू १७०.७ मिलियन डॉलर्स (१५०८. ३२ कोटी) इतकी आहे. तिसऱ्या स्थानावर शाहरुख खान आहे. त्यांची ब्रँड व्हॅल्यू १४५. ७ मिलियन डॉलर्स (१२९३. ३४ कोटी) इतकी आहे. ही तिन्ही नावे २०२३ च्या ब्रँड व्हॅल्यूएशन यादीतही याच क्रमाने होती. या यादीत चौथ्या क्रमांकावर आलिया भट्ट आली आहे. याआधी त्या पाचव्या क्रमांकावर होत्या. २०२४ मध्ये त्यांची ब्रँड व्हॅल्यू ११६.४ मिलियन डॉलर्स (१०३३.१७ कोटी) आहे. अक्षय कुमार आश्चर्यकारकरित्या यंदा सहाव्या क्रमांकावर पोहोचले आहेत. गेल्या वर्षी ते या लिस्टमध्ये चौथ्या क्रमांकावर होते. त्यांची ब्रँड व्हॅल्यू १०८ मिलियन डॉलर्स (९५८.६१ कोटी) रुपये आहे.

### नावनिहाय ब्रँड व्हॅल्यू

| | |
|---|---|
| विराट कोहली– | १९४३. ०४ कोटी |
| रणवीर सिंग– | १५०८. ३२ कोटी |
| शाहरुख खान– | १२९३. ३४ कोटी |
| आलिया भट्ट– | १०३३. १७ कोटी |
| सचिन तेंडुलकर– | ९९५. ८९ कोटी |
| अक्षय कुमार– | ९५८. ६१ कोटी |
| दीपिका पदुकोण– | ९१३. ३५ कोटी |
| महेंद्रसिंह धोनी– | ९१३. ३५ कोटी |
| ऋतिक रोशन– | ८१८. ३७ कोटी |
| अमिताभ बच्चन– | ८४२. ९२ कोटी |

**टॉप १० सेलिब्रिटींची यादी**

दीपिका आणि धोनी यांची ब्रँड व्हॅल्यू समान असल्याने त्यांना संयुक्तपणे सातवा क्रमांक देण्यात आला आहे. यादीत रणबीर कपूर बाराव्या, कार्तिक आर्यन चौदाव्या, रश्मिका मंदाना पंधराव्या, सलमान खान सोळाव्या, अल्लू अर्जुन चोवीसाव्या आणि अनन्या पांडे पंचवीसव्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे अनन्या पांडेचं काही वर्षांपूर्वी ४६व्या क्रमांकावर नाव होते. मात्र, त्यांनी आता टॉप २५मध्ये स्थान पटकावले आहे.

# मराठी गायिकेची प्रेरणादायी वाटचाल : संगीत आणि सामाजिक बांधिलकी

मराठी वाहिनीवरील एका कार्यक्रमासाठी बाली ब्रह्मभट यांनी माझं नाव (**जान्हवी प्रभू–अरोरा**) गायक कुमार शानू यांना सुचवलं. त्यांच्यासोबत गायनाची संधी मिळणं ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट होती. कुमार शानूंसोबत फोनवर बोलताना त्यांनी माझ्या गायनाचं कौतुक केलं, " तू मराठीतली खूप चांगली गायिका आहेस, लोकांना तुझी गाणी आवडतात." त्यांच्यासारख्या मोठ्या कलाकाराचं हे बोलणं ऐकून मी भारावले. मी म्हणाले, "शानूदा, मी तुमची खूप मोठी फॅन आहे. माझ्या नवऱ्याला भेटताना तुमच्या गाण्यांवर आम्ही खूप बोलायचो. आमचं नातं पक्कं होण्यात तुमच्या गाण्यांचा मोठा वाटा आहे." कुमार शानू, अभिजित यांच्यासारख्या दिग्गजांसोबत गाण्याचा अनुभव अविस्मरणीय होता.

करिअरची सुरूवात आणि स्ट्रगल

हिंदीत मला सरूवातीला खूप स्ट्रगल करावं लागलं. काही गाणी रेकॉर्ड केल्यानंतर दुसऱ्या गायकाच्या आवाजात फायनल झाली. यामुळे निराशा व्हायची, पण मी प्रयत्न सुरू ठेवले. लग्न आणि मुलं झाल्यानंतर संगीताकडे काही काळ दुर्लक्ष झालं. पण 'झी मराठी'च्या 'सारेगम' स्पर्धेच्या ऑडिशनबद्दल कौशल इनामदार यांनी सांगितलं. माझी तयारी नसताना नवरा समीरने मला प्रोत्साहन दिलं. मराठी गाण्यांचा अभ्यास करून मी स्पर्धेत भाग घेतला आणि सेमीफायनलपर्यंत पोहोचले. ही स्पर्धा माझ्या करिअरसाठी टर्निंग पॉइंट ठरली. यानंतर मी रियाजचं महत्त्व समजले आणि मेहनत सुरू केली.

**करिअरची वाटचाल**

' सारेगम 'मध्ये परीक्षक अवधूत गुप्ते यांनी माझ्या आवाजाचं कौतुक केलं, " तुझा आवाज प्लेबॅकसाठी परफेक्ट आहे. यावर लक्ष दे, तुझी ' अरोरावी ' चालेल! " (माझं आडनाव अरोरा आहे). यानंतर मी संगीताकडे गांभीर्याने पाहिले. अवधूत गुप्तेंनी ' सनई चौघडे ' चित्रपटातील ' शानाना ' गाण्यासाठी मला संधी दिली. सर्दी असतानाही गायलेलं हे गाणं सुपरहीट झालं. आजही त्यासाठी मला ओळख मिळते. कौशल इनामदार यांच्या संगीत दिग्दर्शनात मी माझा पहिला म्युझिक अल्बम ' जानवी ' काढला.

**प्रयोग आणि सामाजिक बांधिलकी**

मला साचेबद्ध गाण्यांपेक्षा वेगवेगळे प्रयोग करायला आवडतात. सुदैवाने मला तशा संधी मिळाल्या. गायिका म्हणून यश मिळविताना मला समाजाप्रती जबाबदारीही जाणवते. माझा नवरा समीरच्या कल्पनेतून आम्ही दरवर्षी सामाजिक समस्यांवर आधारित गाणं आणि व्हिडिओ बनवणार आहोत. ज्यामुळे समाजात जागरूकता येईल.



## मुंबईत समुद्रकिनारी रहस्यमय प्रचंड मासा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : मुंबईतील जुहू चौपाटीवर गुरुवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी समुद्रकिनाऱ्यावर मिनीबस इतका मोठा मासा पडलेला आढळून आला. त्याच्या शरीरावर धातूसारखी चमकणारी कातडी व डोळ्यांतून निळसर प्रकाश होता. याबाबत समुद्रशास्त्रज्ञ म्हणतात, की हा मासा आम्ही प्रथमच पाहत आहोत. त्यामुळे त्याला ओळखणे शक्य नाही. कदाचित तो नव्या प्रजातीचा असावा. नागरिकांनी घटनास्थळी गर्दी करून फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल केले.

# अमरूद के पत्ते : सेहत का खजाना, जानिए फायदे और सावधानियां

अमरूद के पत्ते आयुर्वेद और मॉडर्न साइंस में सेहत के लिए वरदान माने जाते हैं। ये पाचन, स्किन, डायबिटीज और दिल की समस्याओं में मदद करते हैं।

फायदेः

**पेट की समस्याएं :**

दस्त में राहत के लिए ४–५ पत्तों को उबालकर चाय बनाएं, दिन में १–२ बार पिएं।

**डायबिटीज कंट्रोल :** रोज एक कप चाय ब्लड शुगर को नियंत्रित करती है।

**मुंह की सेहत :** २–३ पत्ते चबाने से छाले, मसूड़ों का दर्द और सांस की बदबू दूर होती है।

**ग्लोइंग स्किन :** पत्तों का लेप दाग–धब्बे और मुहांसों को कम करता है।

वजन और दिल : मेटाबॉलिज्म बूस्ट होता है, कोलेस्ट्रॉल और ब्लड प्रेशर कम होता है।

**सावधानियां :**

**एलर्जी :** पहली बार इस्तेमाल करने से पहले टेस्ट करें, रैश या खुजली हो सकती है।

**शुगर लेवल :** डायबिटीज की दवा ले रहे हैं तो ज्यादा चाय न पिएं, डॉक्टर से पूछें।

**पेट की दिक्कत :** ज्यादा चाय से कब्ज या जलन हो सकती है, १–२ कप तक सीमित रखें।

**प्रेग्नेंसी :** गर्भवती या स्तनपान कराने वाली महिलाएं डॉक्टर की सलाह लें।



### काढ़ा बनाने की विधि

१०–१२ ताजे पत्ते धोकर ३ कप पानी में उबालें। १५–२० मिनट धीमी आंच पर रखें। स्वाद के लिए थोड़ा शहद या गुड़ मिलाएं। गर्म या ठंडा पिएं।

**नोट :** हमेशा ताजे पत्ते यूज करें और दवाइयों के साथ इसके सेवन से पहले डॉक्टर से सलाह लें। सही मात्रा में इस्तेमाल से अमरूद के पत्ते सेहत के लिए फायदेमंद हैं।

**(अस्वीकरण : यह जानकारी सामान्य है। चिकित्सक से सलाह लें।)**




# लोखंडी इच्छाशक्तीचा आयर्नमॅन हार्दिक पाटील ३९ वेळा विजेता

शरीर थकू शकते. मन थकायला नको, हे वाक्य जागवणारे भारतीय ॲथलीट हार्दिक पाटील यांनी पुन्हा इतिहास रचला. फ्रान्समधील आयर्नमॅन वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२५ मध्ये त्यांनी १६ तास ०५ मिनिटांत स्पर्धा पूर्ण केली : ३.८ कि.मी. पोहणे (१ तास १९ मिनिटे), १८० कि.मी. सायकलिंग (८ तास ०८ मिनिटे) आणि ४२.२ कि. मी. धावणे (६ तास ०४ मिनिटे). ही त्यांची कारकिर्दीतील ३९ वी आयर्नमॅन स्पर्धा. मुळात जगातील सर्वांत आव्हानात्मक ट्रायथलॉन स्पर्धेत सहभाग घेणे हेच मोठे यश असते. मात्र हार्दिक यांच्यासाठी ही जीवनशैली आणि साधना आहे.

**कष्ट आणि चिकाटीचा प्रवास**

सर्वसामान्य युवकापासून आयर्नमॅनपर्यंतचा हार्दिक यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. शिस्तबद्ध प्रशिक्षण, रोजचे तासनूतास पोहणे, सायकलिंग, रनिंग, आहार, विश्रांती आणि मानसिक तयारी यात तडजोड नाही. प्रत्येक स्पर्धेचे हवामान, भूप्रदेश आणि वेळेचे बंधन लक्षात घेऊन तयारी करतात. भारतात ट्रायथलॉन अजून फारसे प्रचलित नसताना ३९ वेळा पूर्ण करणे हे अभूतपूर्व.

**आयर्नमॅन म्हणजे काय?**

**ट्रायथलॉन स्पर्धा :** एकाच दिवशी ३.८ कि.मी. पोहणे, १८० कि.मी. सायकलिंग आणि ४२.२ कि.मी. मॅरेथॉन धावणे. ही शारीरिक, मानसिक आणि भावनिक क्षमतांची कसोटी आहे. हार्दिक यांच्या यशाने जागतिक आयर्नमॅन समुदायात भारताचा डंका वाजला.

" हार्दिक पाटील म्हणतात, की प्रत्येकात एक आयर्नमॅन लपलेला आहे. गरज आहे तो जागवण्याची. हल्ली सर्वांना पटकन यशाची घाई झाली आहे. ' पी हळद आणि हो गोरी ' असे होत नाही. कोणत्याही क्षेत्रात प्रचंड परिश्रम, जिद्द, चिकाटी व सकारात्मकता याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यामुळेच मी ट्रायथलॉनसाठी भारतात अप्रचलित व शारीरिक, मानसिक व भावनिक शक्तीची कमालीची परीक्षा पाहणारी स्पर्धा यशस्वी केली आहे. आगामी काळात अ‍ॅल्ट्रा ट्रायथलॉन, कोचिंग कार्यशाळा आणि भारतात ट्रायथलॉन संस्कृतीची रुजवण करण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे.

# फायनल मॅचनंतर असा पस्तावला शोएब अख्तर...!

पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तर हा फटकळपणा बिनधास्तपणासाठी ओळखला जातो. आशिया कप २०२५ च्या फायनल आधी नेहमीप्रमाणे शोएब अख्तर भारताविरुद्ध खूप काही बोलत होता. हा सामना पाकिस्तान जिंकेल असे त्याला वाटत होते. मात्र, ज्या पद्धतीने भारतीय फलंदाज आणि गोलंदाजांनी पाकिस्तानच्या टिमचा अक्षरशः कचरा केला. ते पाहून शोएब इतका निराश व हताश झाला, की भारताने आशिया कप जिंकल्यानंतर त्याच्या तोंडून शब्द निघत नव्हते. तो कोणाशीही बोलण्याच्या मनस्थितीत नव्हता.

जेव्हा जेव्हा भारताने उत्कृष्ट खेळ करून पाकिस्तानला हरवले आहे, तेव्हा तेव्हा खिलाडूवृत्तीने पाकिस्तानातील एखाद– दुसराच मोठा प्लेअर पराभव मान्य करतो आणि भारताच्या खेळाडूंची तारीफही करतो. मात्र, उर्वरीत सर्वच खेळाडू इतकेच नव्हे तर राजकीय नेतेही भारताच्या खेळाडूंची तारीफ करणे तर दूर पण पाराभवाचे सत्य स्वीकारायलाही तयार होत नाही. पाकिस्तानची सामान्य जनता मात्र पाकिस्तानचे खेळाडू व व्यवस्थापनाला भरपूर शिव्या घालतात. तिन्ही सामन्यांमध्ये भारताविरूद्ध पाकिस्तानचा दारूण पराभव झाल्यानंतर शोएब म्हणाला, की ही चूक व्यवस्थापनाची आहे, यात संघाचा दोष नाही. पराभवाचे खापर त्याने व्यवस्थापनावर फोडले. फायनलमध्ये पाकिस्तानच्या सलामीवीराने चांगली सुरुवात केली होती. साहिबजादा फरहान (५७) आणि फखर जमां (४६) यांनी शानदार फलंदाजी केली. मात्र, पण मधली फळी कूचकामी ठरली. परिणामी संघाचा डाव १४६ धावांवर आटोपला. भारताची फलंदाजी सुरुवातीला अडखळली होती. २० धावांवर तीन गडी बाद झाल्यानंतर दबाव वाढला. मात्र, तिलक वर्मा (६९) धावांची मॅच विजयी इनिंग खेळला. त्याला संजू सॅमसन (२४) आणि शिवम दुबेने (३३) धावा करुन चांगली साथ दिली.



शोएब अख्तर पाकिस्तानच्या पराभवासाठी व्यवस्थापनाला जबाबदार मानतो. तो पुढे म्हणतो, की दुर्देवाने पाकिस्तान संघाची अडचण नाही. मधली फळी ही व्यवस्थापनाची चूक आहे. ते योग्य खेळाडूंची निवड करु शकत नाही. पाकिस्तानचे हे अत्यंत अविचारी निर्णय व प्रशिक्षण आहे. मी खूप निराश आहे. सुपर संडे होता. संपूर्ण देश मोठ्या आशेने सामना पहात होता. आमच्या मधल्याफळीत आधीपासून प्रॉब्लेम आहे. आपल्या सर्वांना हे माहित आहे. त्यावर व्यवस्थापनाने उचित उपाययोजना करण्याऐवजी वशिलेबाजी आणि पोरकटपणा केल्यामुळेच पाकिस्तानची हार झाली.

**असा बडबडला होता सामन्यापूर्वी शोएब अख्तर**

" या रविवारी २८ सप्टेंबरला पाकिस्तानी टीमने भारताची घमेंड मोडावी. त्यांचा अंहकार मारावा " असं शोएब अख्तर म्हणाला होता. पुरेपूर मारण्याच्या इराद्याने पाकिस्तानी संघ मैदानात उतरावेत. आपण कुठल्या मातीचे बनलो आहोत, हे भारताला दाखवून द्या. टीम इंडिया अडचणीत येईल असा खेळ दाखवा.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी काँग्रेसतर्फे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात झालेल्या परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके उद्ध्वस्त झाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. हा विचार करून शासनाने तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, या मागणीसाठी काँग्रेसतर्फे प्रांताधिकारी नितीनकुमार मुंडावरे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, की अमळनेर तालुक्यात पावसाळ्याच्या सुरुवातीला अगदी तुरळक पाऊस झाला. पाऊस कमी असल्याने पिकांची वाढ खुंटली. मात्र, सप्टेंबर महिन्यात तालुक्यात परतीचा दमदार पाऊस झाला. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान झाले. पाणंद रस्ते खराब झाले आहेत. माणसांना व जनावरांना चालणे देखील अवघड झाले आहे. गाव खेड्यातल्या कच्च्या घरांची पडझड झाली आहे. शेतकऱ्यांचा मका, कपाशी, सोयाबीन आदी पिकांचे नुकसान झाले आहे. पाण्यामुळे रोगराई पसरली आहे. कपाशीला जेमतेम आलेली कैरी सुद्धा मोठ्या प्रमाणावर धसत आहे. उत्पादनात सुमारे ८० टक्के घट होणार आहे. तालुक्यातील पिकांची नजर आनेवारी ६० च्या पुढे लावली आहे. ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत द्यावी. पाणंद रस्त्यांचे दुरुस्तीचे नियोजन करून काम सुरू करावे. नजर आणेवारी कमी करण्यात यावी. निवेदनावर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, गजेंद्र साळुंखे आदींसह अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

## पीयूष चौधरी बीएएमएस उत्तीर्ण!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील पीयूष काशीनाथ चौधरी याने बीएएमएस परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे. त्याचे वडील काशिनाथ चौधरी हे लोकमान्य विद्यालयात विनाअनुदान तत्त्वावर शिक्षण सेवा देत होते. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्याच्या आई-वडिलांनी पीयूषला पाठबळ दिले. पीयूष चौधरी याने संघर्ष करीतच हे यश संपादन केले आहे. पीयूष हा भाऊसाहेब मुळक आयुर्वेदिक कॉलेज आणि संशोधन रुग्णालय (बुटीबोरी, नागपूरचा) विद्यार्थी होता. त्याला सर्व गुरुजन, मामा व आजी यांचे मार्गदर्शन लाभले. पीयूष इंटर्नशिप करून उच्च शिक्षणही घेणार आहे. धनंजय सोनार, चौधरी कुटुंबीय, आप्तस्वकीय, सहकारी मित्र व अमळनेरच्या वैद्यकीय सेवारत डॉक्टरांनी पीयूषचे अभिनंदन केले आहे.



# आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते ढेकूसीमच्या आर्च बंधाऱ्याचे जलपूजन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : राज्य आपत्ती सौम्यिकरण निधी अंतर्गत तालुक्यातील ढेकूसिम येथील माळण नदीवर आर्च बंधारा बांधण्यात आला आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते त्याचे नुकतेच जलपूजन करण्यात आले.

या बंधाऱ्यामुळे जलसाठा वाढला आहे. परिसरातील जलपातळीही उंचावणार आहे. परिणामी पाणीटंचाईचा प्रश्न मिटण्यास मदत होणार आहे. ढेकूसिमला सिंचन क्षमता वाढवण्यासाठी बंधारा बांधणे गरजेचे होते. लोकनियुक्त सरपंच सुरेखा प्रवीण पाटील यांनी याबाबत तत्कालित मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन मंत्री आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडे मागणी केली होती. त्यांनी आपत्ती व्यवस्थापनांतर्गत दुष्काळ शमन तसेच मृद संवर्धन उपाय योजनेकरीता १ कोटी ७६ लाख रुपये यासाठी मंजूर केले होते. हा बंधारा वक्राकार पद्धतीने बांधण्यात आल्याने जलसाठा वाढण्यास मदत होणार आहे. समस्या सोडवणूक केल्याबद्दल आमदार अनिलदादा पाटील यांचा ग्रामस्थांनी सत्कारही केला. यावेळी एल. टी. पाटील, रामलाल पाटील, लोकनियुक्त सरपंच सौ. सुरेखा पाटील, उपसरपंच जाधवराव पाटील, नामदेव पाटील, भूषण पाटील, समाधान गायकवाड, सौ. बेबाबाई पाटील, मंगल पाटील, सीमा पाटील, सुरेखा भील, मनीषा सोनवणे, चंद्रकांत पाटील, शांताराम पाटील, माधवराव पाटील, शरद पाटील, विलास पाटील, गोकुळ पाटील, भगवान पाटील, ग्रामसेवक कविता साळुंखे, पोलीसपाटील दीपक पाटील, महेंद्र पाटील, वसंत पाटील, नीलेश पाटील उपस्थित होते. रावसाहेब पाटील यांनी सूत्रसंचालन केले.



# सेवा सप्ताह उपक्रमांतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील लायन्स क्लबतर्फे सेवा सप्ताह उपक्रमांतर्गत शुक्रवारी, दि. ३ ऑक्टोबर रोजी मोफत शिबिर इंदिरा भुवन येथे सकाळी नऊ ते बारा या वेळेत झाले. शिबीरात महसूल व पोलिस विभागाचे कर्मचारी, होमगार्ड तसेच नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. २२० जणांनी या शिबिराचा लाभ घेतला.

याप्रसंगी प्रांताधिकारी नितीनकुमार मुंडावरे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम, होमगार्ड कमांडिंग अरुण नेरकर, नायब तहसीलदार सी. यू. पाटील आदींसह महसूल, पोलिस व अग्निशमन विभागातील कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, स्त्रीरोग तपासणी, नेत्र तपासणी, फिजिओथेरपी तसेच हृदयरोग तपासणी करण्यात आली. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. निखिल बहुगुणे, डॉ. युसुफ पटेल, डॉ. मिलिंद नवसारीकर, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. सुमित सूर्यवंशी, नेत्र रोगतज्ज्ञ डॉ. नरेंद्र महाजन, शल्य चिकित्सक डॉ. पंकज चौधरी, डॉ. रवींद्र जैन, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्वप्ना पाटील, फिजिओथेरपिस्ट डॉ. ऋतिक कोठारी यांनी तपासणी केली.

प्रांताधिकारी नितीनकुमार मुंडावरे यांनी सांगितले की, आपल्या धकाधकीच्या जीवनशैलीत वेळोवेळी आरोग्य तपासणी करून घेतली पाहिजे. हे शिबिर कर्मचारी वर्गासाठी उपयुक्त ठरेल. लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सेक्रेटरी महेंद्र पाटील, खजिनदार नितीन विंचूरकर, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. किशोर शहा यांच्यासह लायन्स क्लबचे सदस्य योगेश मुंदडा, विनोद अग्रवाल, येझदी भरुचा, महावीर पहाडे, रवींद्रसिंग कालरा, राजेश जीवनानी, शेखर धनगर, कमलेश भंडारी, चेतन जैन, प्रदीप जैन, अजय हिंदुजा, उदय शहा, महेश पवार, अभिनय मुंदडा, पंकज मुंदडा आदींनी सहकार्य केले.

# अमळनेर तालुका मराठा समाजातर्फे आज समाजभूषण पुरस्कार, गुणगौरव सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : अमळनेर तालुका मराठा समाजातर्फे रविवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी मराठा समाजभूषण पुरस्कार व गुणवंतांचा गुणगौरव सोहळा पटवारी कॉलनीतील मराठा मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता होईल.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ (मुंबई) चे अध्यक्ष श्री. नरेंद्र पाटील यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल. माजी मंत्री तथा आमदार श्री. अनिलदादा पाटील अध्यक्षस्थानी असतील. खासदार श्रीमती स्मिताताई वाघ प्रमुख अतिथी असतील.

माजी आमदार डॉ. श्री. बी. एस. पाटील, माजी आमदार कृषिभूषण श्री. साहेबराव पाटील, माजी नगराध्यक्ष श्री. विनोद पाटील, ज्येष्ठ पत्रकार श्री. पांडुरंग पाटील प्रमुख पाहुणे असतील. पारोळ्याचे आमदार श्री. अमोल चिमणराव पाटील प्रमुख पुरस्कारार्थी आहेत. ढेकू बुद्रुक ग्रुप ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री. नथ्थू गुणवंतराव सोनवणे, माजी जि. पण. सदस्य तथा अमळगावचे लोकनियुक्त सरपंच श्री. गिरीश सोनजी पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विनायक कोते, पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय निकम, अंधेरी ( मुंबई) चे आरटीओ श्री. मयूर निकम हे विशेष सत्कारार्थी असतील.

याप्रसंगी मराठा समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक अमळनेर तालुका मराठा समाजाचे अध्यक्ष श्री. जयवंतराव पाटील, मानद सचिव श्री. विक्रांत पाटील व कोषाध्यक्ष श्री. महेंद्र बोरसे यांच्यासह कार्यकारी मंडळाने केले आहे.

**– अमळनेर :** शहरातील मुख्य बाजारपेंठामध्ये दीर्घकाळापासून बेशिस्त पार्किंगची समस्या दुकानदारांसह नागरिकांनाही सतावते आहे. अनेक जण तर दुचाकीच्या हॅण्डलला लॉक करून बिंद्धास्त निघून जातात. अशा वेळी त्यांच्या दुचाकी हटवणे मुश्किल होते.



# महात्मा गांधी जयंतीनिमित्त शिरूड शाळेत वक्तृत्व स्पर्धा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील शिरुड येथल जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत गांधी जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. प्रतिमापूजन करुन माल्यार्पण करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी गांधीजींचे विचार, त्यांचे सत्य व अहिंसेचे तत्त्वज्ञान यावर भाषणे देऊन

उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमास ग्रेडेड मुख्याध्यापक किरण मारवडकर, उपशिक्षिका सौ. इंदुबाई महाले, सौ. कल्पना बडगुजर व सौ. संगीता पाटील उपस्थित होत्या. उपशिक्षक रवींद्र महाजन यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रकांत पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

# चुकीच्या ट्रेनने आलेला मुलगा रेल्वे पोलिसांच्या ताब्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : चित्रकूटला जाण्यासाठी घरातून निघालेल्या एका अल्पवयीन मुलाला ४९ हजार रुपयांसह रेल्वे सुरक्षा दलाने ताब्यात घेतले आहे. ही घटना शुक्रवार, दि. २ रोजी घडली. अमळनेर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक २ वर एक अल्पवयीन मुलगा बेवारस अवस्थेत फिरताना आढळाला.

रेल्वे सुरक्षा दलाच्या दक्षतेमुळे त्या मुलाला ताब्यात घेण्यात. चौकशीअंती त्याला जळगाव येथील बाल कल्याण समितीकडे सुपूर्द करण्यात आले.

दरम्यान, निरीक्षक सत्यजीत कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक खेलसिंह मीणा, एएसआय कुलभूषणसिंह चौहान आणि कॉन्स्टेबल अमित कुमार यांनी सकाळी सुमारे सव्वानऊ वाजता गस्तीदरम्यान त्या मुलाला पाहिले. चौकशीत मुलाने आपले नाव रघुराज पटेल, वडिलांचे नाव अभिनंदन पटेल (रा. गाव टिकामऊ, पोलीस ठाणे टिकामऊ, जिल्हा महोबा, उत्तर प्रदेश) असे सांगितले.

तो घरच्यांना न सांगता चित्रकूटला जाण्यासाठी निघाला होता. मात्र, चुकीच्या रेल्वेत बसल्याने तो अमळनेरला पोहोचला. त्याच्याकडे ४९ हजार रुपये रोख होते. ती रक्कम त्याने घरातील लॉकरमधून घेतल्याचे सांगितले. त्या मुलाला आपल्या कुटुंबातील कोणाचाही मोबाईल क्रमांक लक्षात नव्हता.

आरपीएफ टीमने गूगलच्या सहाय्याने संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. चौकशीअंती त्यांना असे कळले, की मुलाचे कुटुंबीय त्या ठिकाणी हरवल्याची तक्रार नोंदवण्यासाठी आले होते. मुलगा सापडल्याची माहिती मिळाल्याने तक्रार दाखल करण्यात आली नाही. मुलगा सुरक्षित सापडल्याने त्याच्या कुटुंबीयांनी रेल्वे सुरक्षा दलाचे आभार मानले.

फ्रेश पॉईंट
चहा | कॉपी | ग्रीन टी | दूध
थंड पेय | ब्लॅक टी | लेमन टी
तुमचं मूड करा फ्रेश...!
पत्ता : ट्रक टर्मिनस शॉपी, बाजार समिती समोरील दत्त मंदिर समोर, धुळे रोड, अमळनेर



तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची
सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# महामृत्युंजय मंत्र रचना अन् त्याची शक्ती



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**महामृत्युंजय मंत्र :**

ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनम् ।
उर्वारुकमिव बंधनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात ।।

**अर्थ :**

आम्ही त्रिनेत्रधारी भगवान शिवाचे पूजन करतो. जे सुगंधित आणि समृद्धी वाढविणारे आहेत. ज्याप्रमाणे काकडीचा वेल फांदीपासून वेगळा होतो त्याचप्रमाणे आम्हाला मृत्यू आणि अमरत्वापासून मुक्त कर.

**महामृत्युंजय मंत्राची उत्पत्ती**

मृकंडू ऋषी, भगवान शिवाचे परम भक्त, निपुत्रिक असल्याने ते खूप दुःखी होते. त्यांनी विचार केला, की विश्वाचे नियम बदलणारे महादेव त्यांना संतती प्राप्त करून देऊ शकतात. त्यांनी कठोर तपस्या केली. भक्ताच्या भक्तीपुढे नतमस्तक होऊन महादेव प्रकट झाले. त्यांनी मृकंडूला पुत्राचे वरदान दिले. त्यानंतर सांगितले, की या वरदानासोबत सुख आणि दुःख दोन्ही येईल. वरदानाने मृकंडूला मार्कंडेय नावाचा तेजस्वी पुत्र प्राप्त झाला. मात्र ज्योतिष्यांनी सांगितले, की मार्कंडेयचे आयुष्य फक्त १६ वर्षांचे असेल. ही बातमी ऐकून मृकंडू आणि त्यांची पत्नी दुःखी झाले. त्यांनी मार्कंडेयला शिवमंत्राची दीक्षा दिली आणि सांगितले, की ज्यांनी तुला जीवन दिले तेच तुझे रक्षण करतील. मार्कंडेयला जेव्हा आपल्या अल्पायुष्याची माहिती मिळाली. तेव्हा त्याने ठरविले, की तो भगवान शिवाकडून दीर्घायुष्य मागेल. त्याने महामृत्युंजय मंत्र रचला आणि शिवमंदिरात बसून सतत जप सुरू केला.

**महामृत्युंजय मंत्राची शक्ती**

मार्कंडेय कथामार्कंडेयचे १६ वर्ष पूर्ण होताच यमराजाचे दूत त्याला घेण्यासाठी आले. मात्र मार्कंडेय शिवलिंगाला मिठी मारून महामृत्युंजय मंत्राचा जप करत होता. यमदूतांनी त्याला स्पर्श करण्याचे धाडस केले नाही. ते तसेच परत फिरले. यमदूतांनी यमराजाला सांगितले, की आम्ही त्या भक्ताला हात लावू शकत नाही. यमराज स्वतः मार्कंडेयला घेण्यासाठी आले. मार्कंडेयने यमराजाला पाहूनही मंत्रजप थांबविला नाही. शिवलिंगाला अधिक घट्ट मिठी मारली. यमराजाने त्याला खेचण्याचा प्रयत्न केला तेव्हा मंदिर गर्जनेने थरथरले. तेजस्वी प्रकाशात भगवान महाकाल शिवलिंगातून प्रकट झाले. त्यांनी त्रिशूळ उगारत यमराजाला इशारा दिला, की माझ्या भक्ताला हात लावण्याची तुझी हिंमत कशी झाली ? यमराज थरथर कापत म्हणाले, की प्रभू, मी तुमचा सेवक आहे. जीवांचे प्राण घेण्याचे कार्य तुम्हीच मला सोपविले आहे. महादेवांचा क्रोध शांत झाला आणि ते म्हणाले, की मार्कंडेयच्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे. त्याला मी दीर्घायुष्याचा आशीर्वाद देतो. तू त्याला घेऊ शकणार नाही. यमराज म्हणाले, की प्रभू, तुमचा आदेश सर्वोच्च आहे. जो कोणी मार्कंडेयाने रचलेला महामृत्युंजय मंत्र जपेल त्याला मी हानी पोहोचविणार नाही.

**महामृत्युंजय मंत्राचे फायदे**

**दीर्घायुष्य आणि आरोग्य :** हा मंत्र मृत्यूच्या भीतीवर मात करतो. दीर्घ, निरोगी आयुष्य देतो.

**आध्यात्मिक उन्नती :** नियमित जपामुळे मनःशांती, एकाग्रता आणि आध्यात्मिक प्रगती होते.

**रक्षा आणि समृद्धी :** हा मंत्र रोग, बाधा आणि संकटांपासून संरक्षण देतो आणि समृद्धी वाढवितो. मार्कंडेय ऋषींनी रचलेला महामृत्युंजय मंत्र भगवान शिवाच्या भक्तीचे प्रतीक आहे. या मंत्राच्या जपाने मार्कंडेयने मृत्यूलाही हरविले. हा शक्तिशाली मंत्र आजही आरोग्य, समृद्धी आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी जपला जातो, अशी मान्यता आहे.

# प्रदोष म्हणजे काय? त्याचे व्रत कसे करावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रदोष म्हणजे प्रत्येक महिन्यात येणारी त्रयोदशी तिथी (तेरावी तिथी). सूर्यास्तानंतर सायंकाळची जी वेळ असते तिला ' प्रदोष काळ ' म्हणतात. याच काळात भगवान शंकराची पूजा करण्याच्या व्रताला ' प्रदोष व्रत ' असे म्हणतात. सूर्यास्त झाल्यानंतरची आणि रात्रीची सुरूवात होण्यापूर्वीची वेळ म्हणजेच प्रदोष होय.

**शनिप्रदोष**

एखाद्या महिन्याची शुक्ल किंवा वद्य त्रयोदशी शनिवारी आल्यास तिला ' शनिप्रदोष ' असे म्हटले जाते. प्रदोष हे भगवान शिवाचे व्रत आहे. शनी देव हे भगवान शिवाचे आराध्य, गुरू तथा उपासक आहेत. त्यामुळे शनिप्रदोष व्रत भक्तीभावाने केल्यास भगवान शंकर व शनी देव या दोघांचा आशीर्वाद प्राप्त होतो. शनिप्रदोष व्रत करणाऱ्या व्यक्तीला साडेसाती बाधत नाही. संसारातील संकटे, अडचणी दूर होतात, अशी मान्यता आहे.

**काय आहे आख्यायिका?**

स्कंदपुराणानुसार एक विधवा आपल्या मुलांसह भिक्षा मागून गुजराण करीत होती. एकदा ती भिक्षा मागून परतताना तिला नदीकिनारी एक बालक दिसला. त्याचे तिने घरी आणून संगोपन केले. हा बालक म्हणजे विदर्भ राज्याचे राजकुमार धर्मगुप्त होते. शत्रूंनी त्याच्या माता-पित्याचा पराभव करून त्यांची हत्या करून या बालकास फेकून दिले होते. शांडिल्य ऋषींनी त्या महिलेस प्रदोष व्रत करण्याचा उपदेश केला. त्याचे फळ म्हणून पुढे त्या बालकाचा विवाह गंधर्व राजाच्या कन्येशी झाला. त्यानंतर तिच्या मदतीने त्याने आपले राज्य परत मिळविले. त्या महिलेचा धर्मगुप्तने माता म्हणून सांभाळ केला.

**कसे करतात व्रत पालन?**

शनिप्रदोषच्या दिवशी पिंपळाच्या झाडाची पूजा करणे अधिक फलदायी मानले जाते. हे व्रत करताना व्रत पालन करणाऱ्याने दिवसभर उपवास करून सूर्यास्तावेळी म्हणजेच प्रदोषकाळी अंघोळ करून शिवपूजन करावे. त्यानंतर शनिप्रदोष कथा वाचावी व उपवास सोडावा. असे केल्याने शिवासोबत शनीकृपेचा लाभ होतो. शनीच्या कोपापासून सुटका होते. धन व समृद्धी लाभते. या व्रताचे आचरण कोणत्याही प्रदोषपासून करता येते. नियमित प्रदोष करणे जास्त लाभदायी असते. मात्र ज्यांना ते शक्य नाही त्यांनी कोणत्याही शनिप्रदोषपासून व्रत धारण करावयास हरकत नाही, असेही शास्त्र सांगते.



# अमळनेरला उद्यापासून कुलस्वामिनी श्री चामुंडा माता प्राणप्रतिष्ठा सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील धुळे रोडवरील मातोश्रीनगरात सोमवार, दि. ६ ऑक्टोबरपासून तीन दिवसीय कुलस्वामिनी श्री चामुंडा माता मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते मंदिर लोकार्पण सोहळा होईल. याप्रसंगी अखिल भारतीय बडगुजर समाज महासमितीचे अध्यक्ष सुरेश महाले अध्यक्षस्थानी असतील. याप्रसंगी खासदार स्मितताई वाघ, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, सौ. पुष्पलतताई पाटील, माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, शिरीषदादा चौधरी प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित राहणार आहेत.



सोमवार, दि. ६ रोजी दुपारी दोनला संत सखाराम महाराज वाडी संस्थानातून मूर्ती प्राणप्रतिष्ठेसाठी मिरवणूक निघेल. सायंकाळी सहाला महेंद्रकाका पाटील व सौ. विद्याताई महेंद्र पाटील यांच्या हस्ते आरती होईल. मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर रोजी विशाल प्रवीण बडगुजर यांच्या हस्ते श्री चामुंडा मातेची अखंड ज्योत तालुक्यातील पिळोदा येथून सकाळी आठला निघेल. त्यानंतर आगमन व ज्योत दर्शन होईल. दरम्यान, विविध पूजा- विधीही यावेळी होणार आहेत. सायंकाळी सहाला किरण खेमचंदशेठ बडगुजर व सौ. कल्याणी बडगुजर यांच्या हस्ते आरती होईल. बुधवार, दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊला श्रीक्षेत्र कपिलेश्वर येथील मठाधिपती आचार्य महामंडलेश्वर स्वामी हंसानंद महाराज यांच्या हस्ते कळस व ध्वजारोहण समारंभ होईल. त्यानंतर हितेंद्र जगन्नाथशेठ बडगुजर व सौ. रामेश्वरी बडगुजर यांच्या हस्ते कुस्वामिनी श्री चामुंडा माता मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होईल. हेमंत पाठक (धरणगाव), सारंग पाठक आदी पौरोहित्य करतील. त्यानंतर महाप्रसाद वाटप होईल. खेमचंद बडगुजर व महेंद्र पाटील त्याचे मानकरी आहेत.

## अमळनेरला आजपासून आई आशापुरी देवीचा ५६ भोग सोहळा

**अमळनेर** : आई कुलस्वामिनी आशापुरी भक्तमंडळातर्फे रविवार, दि. ५ ऑक्टोबरपासून दोन दिवसीय ५६ भोग सोहळा होणार आहे. लाडशाखीय वाणी मंगल कार्यालयात हा कार्यक्रम होईल. रविवारी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान वाडी चौकातून कुलस्वामिनी माता मूर्तीची शोभायात्रा निघेल. दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान देवी उत्सव मूर्ती प्रतिष्ठापना, पूजन व आरती होईल. दुपारी १२ ते २ दरम्यान भोजन कार्यक्रम होईल. सोमवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेदरम्यान गणपती पूजन, कलश पूजन, श्री देवी कमला प्रयोग अभिषेक, कुंकूमार्चन, कुमारिका पूजन होईल. दुपारी १२ ते १२:३० आरती व ५६ भोग महानैवेद्य, दुपारी १२:३० ते २ भाविकासाठी फराळ, सायंकाळी ६ ते रात्री ९ सागर देशमुख यांच्या स्वरात देवीची गीते, रात्री ८ ते १० वाजेदरम्यान महाप्रसाद वाटप होईल. रात्री नऊला सांगता आरती होऊन सांगता होईल. या कार्यक्रमाचा समाजबांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभाकर कोठावदे, संजय शिरुडे, सुनील भामरे, संजय भामरे, राजेंद्र कोठावदे, राजेंद्र कोतकर यांनी केले आहे.

## श्रींचा पालखी उत्सव जल्लोषात; भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग

**अमळनेर** : येथील वाघ बिल्डिंग परिसरातील श्री साईबाबा मंदिराचा पालखी उत्सव गुरुवारी भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. साईनाथांच्या जयघोषाने संपूर्ण मिरवणूक मार्ग दुमदुमला होता.

उदय सोमनाथ पाटील यांनी पहाटे काकड आरती केली. आमदार अनिलदादा पाटील व माजी नगराध्यक्षा जयश्रीताई पाटील यांनी सकाळची आरती केली . त्यानंतर पालखी मार्गस्थ झाली. वड चौक, झामी चौक, ब्रह्मे गल्ली, वाडी चौक, सराफ बाजार, दगडी दरवाजा, कुंटे रोड, पवन चौक, त्रिकोणी बागेवरून पालखी मंदिरात दाखल झाली. त्यानंतर अर्बन बँकेचे उपाध्यक्ष लक्ष्मण (पप्पू) महाजन यांच्या हस्ते मध्यान्ह आरती झाली. रात्री सिद्धेश पाठक यांनी शेज आरती केली . दरम्यान, पालखी सोहळ्यानिमित्त मंदिरावर फुलांची सजावट करण्यात आली होती. सुरेख रांगोळ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले होते. दरम्यान, चाळीसगाव येथील समर्थ बॅण्डच्या समुधूर भक्तीगीतांनी उत्तम वातावरण निर्मिती केली होती. महिला पारंपरिक वेशभूषेत डोक्यावर कलश घेऊन मिरवणूकीत सहभागी झाल्या होत्या. श्रीसंत सखाराम महाराज पाठशाळेतील मुलांचा टाळमृदुंगाचा गजर, राजमुद्रा महिला ढोल पथकाच्या निनादाने आसमंत दुमदुमला होता. पालखी मार्गावर ठिकठिकाणी पृष्पवृष्टी करण्यात आली. गरबा नृत्यात महिला तल्लीन झाल्या होत्या. पालखी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.



# रामलीला : पारंपरिक लोकनाट्योत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रामलीला हा उत्तर भारतातील पारंपरिक लोकनाट्योत्सव आहे. दरवर्षी नवरात्रात (आश्विन शु. प्रतिपदा ते आश्विन शु. दशमी) हा उत्सव साजरा केला जातो. गुजरात, पंजाब, बिहार, मध्य प्रदेश, ओरिसा, बंगाल, राजस्थान इत्यादी राज्यांतही रामलीला साजरी होते. काही विद्वानांच्या मते दसऱ्याच्या दिवशी प्रभू श्रीरामांनी लंकाधिपती रावणावर विजय मिळविला होता. त्या विजयाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा उत्सव साजरा करीत असावेत. रामायणात रस्त्यावरून लव-कुश रामायण गात चालल्याचा जो उल्लेख आहे त्यामध्ये रामलीलेची मूळ प्रेरणा असावी. अनेक लहान-मोठ्या शहरांतून रामलीला विविध ठिकाणी आणि प्रकारे सादर केली जाते. सीतास्वयंवर, प्रभू श्रीराम यांचे वनवास गमन, रावण-जटायू युद्ध, लंका दहन इत्यादी प्रसंग रामलीलेत प्रामुख्याने अंतर्भूत असतात.प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता यांच्या भूमिकांसाठी १४ वर्षांखालील मुलांची निवड करतात. रावण, कुंभकर्ण, विभीषण, हनुमान इत्यादींसाठी तांबे-पितळेचे मुखवटे वापरतात. या भूमिका स्थानिक मंडळी वर्षानुवर्षे करताना दिसतात. श्री हनुमानांच्या भूमिकेला विशेष महत्त्व असते. कधी- कधी वानरसेनेच्या मुखातून रामायण गातानाही दाखविले जाते.

तुलसीदासांनी रामलीलेच्या धार्मिक उत्सवाची सुरूवात केली, असे म्हणतात. यासाठी दिल्ली शहर फार प्रसिद्ध आहे. १९२० मध्ये मुद्दाम याच उत्सवासाठी तयार केलेल्या रामलीला मैदानावरच अजूनही हे कार्यक्रम होतात. महंत राधोदास यांनी बहादूरशाह जफरच्या कारकीर्दीत (१८३७ ते ५७) दिल्लीत रामलीला सुरू केली. १९३८ मध्ये या कार्यक्रमासाठी एक समिती स्थापण्यात आली. तेव्हापासून या समितीमार्फतच हा उत्सव साजरा होतो. दिल्लीत जवळजवळ ५० ठिकाणी रामलीला सादर केली जाते.या सर्व ठिकाणी अधिक उंच प्रतिकात्मक रावण तयार करण्याचीही अहमहमिका असते.

अयोध्येत आश्विन वद्य नवमीला रामलीला सुरू होऊन ती पुढे सतरा दिवस चालते. येथील लंकादहनाचा प्रसंग उल्लेखनीय असतो. त्यासाठी रावणाचा महाल सुमारे १८ ते २१ मीटरचा उंच बनवितात. श्री हनुमान दोरीच्या सहाय्याने त्या महालावर जाऊन आग लावतात. काही ठिकाणी रावणाच्या पुतळ्याला एका वर्तुळात दहा तोंडे आणि मध्यभागी गाढवाचे तोंड लावलेले असते.



काशीजवळील रामनगरची रामलीला सुप्रसिद्ध आहे. ती ३० ते ४० दिवस चालते. साधारणतः १२ कि.मी.च्या परिसरात ही सादर केली जाते. त्यासाठी रामायणातील अयोध्या, मिथिला, पंचवटी, लंका इत्यादी स्थाने आधीच तयार करतात. असे खुले रंगमंच माळवा, बुंदेलखंड या भागांत आढळतात. रामायणातील प्रसंग सादर करताना दृश्यानुरूप रंगमंच बदलतात. तेव्हा प्रेक्षकही आपापल्या जागा बदलतात. रंगमंचावर तुलसीदासाच्या रामचरितमानसातील चौपाया गातात. त्यानंतर कलाकार स्थानिक बोलीत आपले संवाद बोलतात. लंकादहनाची आतषबाजी पाहण्यासाठी हजारो प्रेक्षक येतात. प्रतिकात्मक स्वरूपातील उंच रावण आणि त्यापेक्षा कमी उंचीचे इतर राक्षस (मेघनाद, कुंभकर्ण) तयार करून मैदानावर उभे करतात. हे कागदाचे व पोकळ असतात. त्यात बाण व इतर प्रकारचे शोभेची दारू, फटाके, आतषबाजीचे सामान भरून ठेवतात. उत्तम अभिनय करणाऱ्या मुलांना प्रभू श्रीराम-लक्ष्मणादिकांची सोंगे देऊन मोठ्या थाटामाटाने आणतात. लंकानगरीची सजावटही प्रेक्षणीय असते. रात्र होताच उभय पक्षांकडून बाण सुटतात व सुमारे तासाभरातच सर्व लंकानगरीची आणि राक्षसांची राखरांगोळी होते. राक्षस जळू लागताच त्यातून शेकडो तऱ्हेची शोभेच्या दारूची चक्रे, फुले वगैरेंची नयनरम्य आतषबाजी पाहावयास मिळते. काही ठिकाणी दसऱ्यानंतर दोन दिवसांनी भरतभेटीचा सोहळाही समारंभपूर्वक पार पाडतात.

# नवरात्रीत देवीचा विसर्जनाचा काळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दशमीला देवता विसर्जन करावे. दशमी दोन दिवस असल्यास पूर्व दिवशी जर श्रवणनक्षत्राच्या शेवटच्या चरणाचा योग असेल, तर दुसऱ्या दिवशी दशमीमध्ये करावे. दशमी जर दोन दिवस नसली आणि पूर्व दिवशी दशमीला श्रवणयोग जरी नसला, तरी करावे. नक्षत्र योगाच्या अनुरोधाने जर विसर्जन करायचे असेल, तर ते मध्यान्ह काळी करावे. नक्षत्राच्या अनुरोधाने जर प्रतिमा असेल, तर तिचे विसर्जन करावे. मृत्तिकादिकांची जर प्रतिमा असेल, तर तिचे विसर्जन करून ती उदकांदिकांत टाकावी. परंपरागत पूजा करण्याची जर धातूची मूर्ती असेल, तर तिचे घटादिस्थापनेपासून ' उत्तिष्ठ ' इत्यादी मंत्रांनी उत्थापन करावे. विसर्जन करू नये. देवता विसर्जनाच्या दिवशी पूर्वी धरलेले नियम सोडावेत हे जरी योग्य असले, तरी नवमीलाच पारणा करावी. नवमीला पारणा करून दशमीला अभिषेक करावा. त्यानंतर मूर्तीचे विसर्जन करावे. असे वचन असल्याचे दुसरे ग्रंथकार सांगतात. या बाबतीत अशी व्यवस्था करावी, की पूर्व दिवशी स्वल्प अष्टमीयुक्त नवमी, दुसऱ्या दिवशी पारणेचा योग अशी नवमीयुक्त दशमी आणि तिसऱ्या दिवशी श्रवण नक्षत्रयुक्त अशी विसर्जनाला योग्य दशमी, याप्रमाणे असतात. अष्टमी व नवमीची अशी दोन उपोषणे पहिल्या दिवशी येतात. यास्तव, अवशिष्ट राहिलेल्या नवमीत पारणा करून शेष दशमीत विसर्जन करावे. शेष नवमीच्या दिवशीच विसर्जनाला योग्य अशी दशमी जेव्हा असेल तेव्हा विसर्जन करून, नंतर पारणा करावी.

पहिल्या दिवशी साठ घटका अष्टमी, दुसऱ्या दिवशी शेषाष्टमीयुक्त नवमी आणि तिसऱ्या दिवशी नवमीशेषयुक्त दशमी, असा योग ज्यावेळी असेल तेव्हाही नवमीने युक्त अशा दशमीलाच विसर्जन आणि पारणाही करावीत.

अष्टमी, नवमी व दशमी या तिन्ही तिथी जेव्हा सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अखंड आणि ज्या-ज्या कृत्यांना योग्य असतील तेव्हा दाक्षिणात्य (नर्मदेच्या खालच्या) लोकांचा नवमीलाच पारणा करण्याचा परिपाठ आहे. याकरिता नवमीलाच पारणा आणि विसर्जनही करावे. दशमीला करण्याची ज्यांची परंपरा असेल त्यांनी दशमीलाच या दोन्ही गोष्टी कराव्यात.

